पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी

**सभावृत्तांत**

(कार्यपत्रिका क्र. ५)

दिनांक : १३/०८/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

-----------------------------------------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक १३/०८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे सभापती
२. मा. भारती फरांदे
३. मा. आर.एस.कुमार
४. मा. जावेद रमजान शेख
५. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
६. मा. पांढरकर निलेश शंकरराव
७. मा. राजू मिसाळ
८. मा. नेटके सुमन राजेंद्र
९. मा. तरस बाळासाहेब जयवंत
१०. मा. सौ.काळभेर वैशाली जालिंदर
११. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री. जी.आर. चिंचवडे, - कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्रीम. लता बाबर-उपअभियंता विद्युत, श्री.संजय भोसले, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे - उपअभियंता स्थापत्य, श्री.आबासाहेब ढवळे- उपअभियंता (जलनि:सारण), श्री. प्रदिप पुजारी - उपअभियंता (झो.नि.पु.), श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.डी.एस.सासवडकर – मुख्य आरोग्य निरीक्षक, इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक १०/०७/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे जुलै चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ४ ) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ | मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/९/२९५/२०१४<br>दिनांक ०५/०८/२०१४<br>मौजे रावेत येथील स.नं. २१५ येथे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेबाबत. |
| विषय क्र. २ | मा. आर.एस. कुमार यांचा प्रस्ताव.<br>चौकाचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ३ | मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव<br>से.नं.२४ मधील स्थापत्यविषयक विविध कामे करणेबाबत. |
| विषय क्र. ४ | मा. बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव<br>रत्याचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र. ५ | मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव<br>क्षेत्रीय कार्यालयाचे इमारतीमध्ये बील भरणा-या नागरीकांसाठी शेड टाकण्याबाबत. |

खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

**मा.बाळासाहेब तरस**: एमबी कॅम्प किवळे येथे आणखी दोन फिरते शौचालय उपलब्ध करुन द्यावेत.

**क्षेत्रीय अधिकारी:** आरोग्य विभागाने फिरत्या शौचालयाची मागणी मुख्यालयाकडे करावी व उपलब्ध झालेनंतर एमबी कॅम्प किवळे येथे मागणीप्रमाणे फिरते शौचालय द्यावे. तात्पुरता एक शौचालय वाढविता येत असल्यास तशी कार्यवाही करावी.

**मा.आर.एस.कुमार:** पवना धरण भरले असल्याने जादा वेळ व प्रेशरने पाणी सोडण्यात यावे, यासाठी पाण्याचे नियोजन करावे.

**मा.बाळासाहेब तरस:** किवळे भागात लाईट गेलेनंतर पंपींग व्यवस्था बंद पडते व नागरीकांना पाणी मिळत नाही. यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची सोय करण्यात यावी.

**क्षेत्रीय अधिकारी:** याबाबत विभाग प्रमुखांच्या बैठकीत चर्चा झालेली असून जनरेटरची सोय करण्याची कार्यवाही चालू आहे.

**मा.आर.एस.कुमार:** विर सावरकर भवन व भक्ती-शक्ती चौकातील भाजीवाल्यामुळे व फेरीवाल्यांमुळे वाहतुकीस अडथळा होत असून याबाबत नागरीक माझेकडे तक्रारी करीत आहेत. त्यामुळे त्यांना हटविण्यात यावे.

**मा.भारती फरांदे:** डेंग्यूची साथ चालू आहे त्यामुळे औषध फवारणी वेळोवेळी करणे गरजचे आहे, परंतु नियमित फवारणी केली जात नाही, फवारणीसाठी योग्य प्रमाणात औषध वापरले जात नाही, तसेच

पावडर देखील टाकली जात नाही. या कामी कर्मचारी कमी असलेस ठेकेदारी पध्दतीने कर्मचारी नियुक्त करावेत व सदरची बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून देणेत यावी.

**मा.सुभद्रा ठोंबरे:** दुर्गानगर येथील शौचालयाची सफाई केली जात नाही तसेच आंबेडकर नगर येथील शौचालयातील पाण्याचा नळ तुटलेला आहे तो तातडीने दुरुस्त करणेत यावा.

**मा.बाळासाहेब तरस:** मामूर्डी येथील सार्वजनीक शौचालयाची टाकी फुटलेली असून रत्यावर मैला वाहत आहे.

**मा.वैशाली काळभोर:** मोहननगर येथील राष्ट्रमाता जिजाऊ सांस्कृतिक भवनाचे भाडे अद्याप निश्चित केलेले नाही.

**क्षेत्रीय अधिकारी:** भाडे ठरविण्याबाबत नगररचना विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २९ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १३/०८/२०१४ | विभाग | : नगररचना |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. नेटके सुमन राजेंद्र |

संदर्भ: मा. आयुक्त यांचेकडील पत्र मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक
नरवि/कावि/९/२९५/२०१४ दिनांक ०५/०८/२०१४

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा सुधारित विकास आराखडा शासनाच्या दिनांक २८/११/१९९५ च्या अधिसुचनान्वये मंजुर झालेला असून सदर मंजूर विकास योजनेतील काही भाग शासनाच्या सन १९९७ अन्वये प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रण कक्षेतून मनपाच्या नियोजन कक्षेत आलेला आहे. मौजे रावेत येथील स.नं.२१५ मध्ये मूळ मालकांनी प्लॉटींग केलेले असून सदरचे प्लॉटिंग पी आर एच /एनए/ एस एस/२२०/ २००३ दिनांक १२/११/२००३ अन्वये मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून मंजूर केलेले आहे. सदरचे प्लॉटिंग मंजूर करतेवेळी औध रावेत BRTS रस्त्यापासून ७.५० मिटर रुंद रस्ता प्लॉट नं.१३ पर्यंत व ६.५० मी.रुंदीचा रस्ता शेवटच्या प्लॉटपर्यंत असून सदर रस्त्याचा वापर प्लॉटींग धारकास परिसरातील नागरीक करीत आहेत.

श्री.नितिन छगनलाल जैन व इतरांनी सदर अस्तित्वात असलेला खाजगी रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करणेबाबत मा.नगररचना विभागाकडे अर्ज सादर केला आहे. सदर अर्जावर मा.आयुक्त यांचे कक्षात दिनांक २१/५/२०१४ रोजी सुनावणी झाली. त्यानंतर नगररचना विभागाने प्रस्ताव सादर केल्यानंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये अस्तित्वात असलेला खाजगी रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करावा असे निर्देश दिले.

कार्यकारी अभियंता विद्युत, ब प्रभाग यांचेकडील पत्र क्र.बप्र/वि/४९४/२०१३ दिनांक २०/०७/२०१३ नुसार स.नं.२१५ व २१६ मधून जाणा-या ७.५० मिटर रुंदीच्या रस्त्यावर पथदिव्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सन २००८ मध्ये केलेले आहे. कार्यकारी अभियंता जलनि:सारण विभाग यांचेकडील पत्र क्र.बप्र/जनि/१३७/२०१३ दिनांक ०१/०४/२०१३ नुसार रावेत स.नं.२१५ व २१६ मधून जात असलेल्या ७.५० मी. रुंदीच्या रस्त्यामध्ये असलेले ड्रेनेज लाईन पिं.चिं. मनपाकडून JNNURM अंतर्गत करणेत आलेले आहे. तसेच कार्यकारी अभियंता स्थापत्य, ब प्रभाग यांचेकडील पत्र क्र.बप्र/चिं.च/काअ/०३/३२४/२०१२ दिनांक २१/१२/२०१२ नुसार मौजे रावेत स.नं.२१५ मधील बीआरटीएस रस्तापासून भूखंडाच्या शेवटपर्यंत ७.५० मी/६.०० मी.रूंदीचा रस्ता स्थापत्य विभाग ब प्रभाग पिं.चिं.मनपाकडून खडीमुरुमाचा करणेत आला आहे. या सर्व पायाभूत सुविधा मनपाकडून पुरविणेत आलेल्या आहेत.

तथापि सदर ठिकाणी मनपाचे मंजूर विकास योजनेत सदरचा रस्ता दाखविणेत आलेला नाही, त्यामुळे या भागातील वाहतुकीचे नियोजनाचे दृष्टीने मौजे रावेत येथील स.नं.२१५ मध्ये औंध-रावेत BRTS रस्त्यापासून ले-आउटमधील नकाशत दर्शविल्याप्रमाणे A-B (प्लॉट नं.१३ पर्यंत) ७.५० मी.रुंद व B-C (प्लॉट नं.१३ पासून शेवटच्या प्लॉट पर्यंत) ६.५० मी.रुंद रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता सदर जागेचा कोणताही मोबदला देय होणार नाही. या प्रमाणे घोषित करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३० | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १३/०८/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा. आर.एस. कुमार यांचा प्रस्ताव

सेक्टर २४ मधील निलकंठेश्वर मंदिराजवळील चौकास "कै.सचिन मारुती सावंत चौक" तसेच कर्मवीर भाऊराव पाटील रोड मधून एलआयजी कडे जाणा-या रस्त्याचे चौकास "सौ.अनिता संजय कांबळे चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३१ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १३/०८/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. भारती फरांदे | अनुमोदक | : मा. सौ. प्रतिभा भालेराव |

संदर्भ: मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव

सेक्टर २४ मधील स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

१) चिंतामणी बाग ची अर्धवट कमान पूर्ण करणे.

२) चिंतामणी बाग येथील संडास बाथरूम ची तूटलेली दारे/ स्टाईल बसविणे.

३) निगडी गावठाणमधील दोन्ही टॉयलेट ब्लॉकची वापरायोग्य दूरूस्ती करणे.

४) कबीर बाग येथील टॉयलेट ब्लॉकवर बसविणेत आलेल्या पाण्याच्या टाकीस नळ जोडून पाण्याची व्यवस्था करणे.

५) लोकमान्य हॉस्पिटल मागील बाजूस ड्रेनेज लाईन नेहमी ब्लॉक होत असलेने ती बदलणे.

वरील स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३२ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १३/०८/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. भारती फरांदे | अनुमोदक | : मा. सौ. प्रतिभा भालेराव |

संदर्भ: मा. भारती फरांदे यांचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयात विविध बिले भरण्यासाठी येणा-या नागरीकांना उन/ पाऊस यापासून संरक्षण मिळण्यासाठी तसेच रांगेत उभे राहून बिले भरण्यासाठी पत्राशेड टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३३ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १३/०८/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. बाळासाहेब तरस | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१८ किवळे मधील पेंडसे कॉलनी विकासनगर येथील रस्त्यास "स्वर्गीय पी.राजगोपालन मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी - ४४
अक्षेका /११/ कावि/२७५ /२०१४
दिनांक ०६ /०९ /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी